# महाराष्ट्र कृषि सेवा (पूर्व) परीक्षा-२०१८

## घोषणा

### जाहिरात क्रमांक (१९/२०१८)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २० मे, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषि सेवा (पूर्व) परीक्षा-२०१८ चा निकाल दिनांक **२१ जुलै, २०१८** रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.**

**३. मुख्य परीक्षा शनिवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०१८ रोजी घेण्यात येईल.**

४. प्रस्तुत निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व **अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेले दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीचे शुध्दीपत्रक आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट -'ब' पदांसाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.**

५. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्विकारार्ह ठरतील.

**ठिकाण:- मुंबई**
**दिनांक:- २१ जुलै, २०१८**

उपसचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.मुंबई